# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०७/०१/२०१७

दिनांक ०७/०१/२०१७ रोजी मुखबिर कडून मिळालेल्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक साो. गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख, यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक श्री. यशवंत नलावडे, स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन गडचिरोली हद्दित स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली चे अधिकारी व कर्मचारी यांनी गडचिरोली येथील ढिवर मोहल्ला, आर्शिवाद मंगल कार्यालय जवळ राहत असलेल्या नामे गोपाल तुळशिराम बावणे वय-४० वर्ष, याचे घरझडती मध्ये देशी दारुच्या १०६५ निपा किंमत ५३२५०/- रुपयाचा माल अवैध्यरित्या विक्री करीता बाळगून मिळून आल्याने पोलीस स्टेशन गडचिरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोउपनि सुनील इंगळे, मपोउपनि समु चौधरी, पोहवा/भाऊराव बोरकर, पोहवा/ गुरनूले, नापोशि/प्रमोद वाळके, पोशि/दुधराम चव्हारे, मपोशि/ सोनी तावाडे, चापोशि/प्रशांत पातकमवार यांनी पार पाडली आहे.